मुंबई उपनगर येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव यांच्या विरुध्दच्या तक्रारीबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र.सकआ २०१९/प्र.क्र.१५/आस्था-२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २१ जून, २०१९.

वाचा:- शासन पत्र क्र.सकआ २०१८/प्र.क्र.२४४/आस्था-२, दि.२९ सप्टेंबर, २०१८

शासन निर्णय:-

नगरसेवक श्री.सगुण नाईक यांच्याकडून त्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी मुंबई उपनगर येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव यांनी रू.५०.०० लाख इतक्या रकमेची मागणी केल्याबाबत विधानमंडळामध्ये मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

२. या संपूर्ण प्रकरणाची महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या कलम २५ (४) तरतुदीनुसार आवश्यक ती चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून दि.२९.९.२०१८ च्या पत्रान्वये श्री.ज्ञा.ल.सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती रद्द करण्यात येत असून, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकारी म्हणून प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

३. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रस्तुत चौकशी एक महिन्यांच्या आत पूर्ण करावी व चौकशी अहवाल विभागास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६२४१३१०३३६३२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0f7d1eee7567d430eefd928eefa78ed2a6072c4ce8f3c0aa4efaf26d9c32daeb, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bd10fe5a55495bc381e7b4d4b658250c74eb3f55113a21fd21c8620f04c2c257, ou=SOCIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2019.06.24 14:40:49 +05'30'

(सं. गि. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत,

१. मा.सभापती, विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
२. मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक
५. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६. आस्था-२ निवडनस्ती.